सरपंच पदाचा पदभार नवीन
निवडून आलेल्या सरपंचांना
देणेबाबत ---

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग,
परिपत्रक क्रमांक व्हीपीएफ/१४६९/२२१३५/ई,
सचिवालय, मुंबई-३२ (बीआर), दिनांक २५ ऑगस्ट १९७२.

वाचा:- (१) ग्राम विकास विभाग परिपत्रक क्रमांक व्हीपीएम/२४६७/३३९९२/ई, दिनांक ८ नोव्हेंबर १९६७.

(२) ग्राम विकास विभाग परिपत्रक क्रमांक व्हीपीएफ/१४६९/३५३४४/ई, दिनांक २८ ऑक्टोबर १९६९.

(३) ग्राम विकास विभाग परिपत्रक क्रमांक व्हीपीएम/१२७०/५८००२/ई, दिनांक ४ मार्च १९७२.

परिपत्रक:- ग्राम पंचायतीच्या सरपंचाचे अधिकार व कर्तव्ये ग्राम पंचायत कायद्याच्या कलम ३८ मध्ये दिलेली आहेत. त्यानुसार तो ग्राम पंचायतीच्या सर्व व्यवहाराचे नियमन व नियंत्रण करण्याला जबाबदार असतो. ग्राम पंचायत निधीचे व्यवहार सरपंच व सचिव यांनी संयुक्तपणे हाताळावयाचे असतात. सचिवाने निरनिराळी रजिस्टरे व पंचायतीचे दप्तर लिहावयाची असून ती सर्व त्याचे ताब्यात असली पाहिजेत. सरपंचाजवळ पंचायतीचा रोख पैसा अगर दप्तर असण्याचे कारण नाही. याबाबतची संपूर्ण कायदेशीर तरतूद या विभागाचे परिपत्रक क्रमांक व्हीपीएम/२४६७/३३९९२/ई, दिनांक ८ नोव्हेंबर १९६७ मध्ये स्पष्ट केलेली आहे. वस्तुतः ग्राम पंचायतीचे सर्व दप्तर व पैसे ग्रामपंचायत सचिवाचेच ताब्यात असले पाहिजेत. असे असून सुध्दा माजी सरपंचांनी आपले पदाचा पदभार नवीन सरपंचांना न देण्याबाबतची बरीच प्रकरणे गेल्या काही वर्षांत शासनाचे नजरेस आलेली होती. या प्रकरणींना आळा बसावा व यापुढे अशी प्रकरणे होऊ नयेत या उद्देशाने संबंधित अधिका-यांना या विभागाच्या परिपत्रक, दिनांक २८ ऑक्टोबर १९६९ अन्वये खालील सूचना देण्यात आल्या:-

(१) नवीन सरपंचास त्याची निवडणूक झाल्याच्या तारखेपासून एक आठवड्याच्या आंत पदभार न मिळाल्यास, ते जिल्हाधिका-याला कळविण्याची जबाबदारी पंचायत सचिवाची राहील. या बाबतीत त्याने कसूर केल्यास, त्याचे विरूध्द खाते कारवाई केली जावी.

(२) वरील प्रमाणे जिल्हाधिका-याला सूचना मिळाल्याच्या तारखेपासून एक आठवड्याच्या आत त्यांनी जुन्या सरपंचांना "कारण दाखवा" नोटीस काढून उ-तर देण्याकरिता जास्तीत जास्त एक महिन्याचा अवधी द्यावा व कोणत्याही कारणासाठी यांत मुदतवाढ देऊ नये.

(३) जिल्हाधिका-यांस अधिक चौकशी करणे जरूर वाटल्यास ती मुख्य कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी यांचे मार्फत न करता तहसिलदारांमार्फत वर दिलेल्या मुदतीतच करावी.

(४) दिलेली मुदत संपल्यावर जुन्या सरपंचाचे उ-तर आले अथवा न आले तरी जिल्हाधिका-यांनी एक आठवड्याच्या आंत कलम १७९(१) व (२) खाली जरूर ते आदेश काढून त्यांची अंमल बजावणी करावी.

२. विभागीय आयुक्तांकडून अहवाल मागवून वरील व्यवस्थेबाबत नुकतेच पुनर्विलोकन करण्यांत आले. वरील सूचनांचे कसोशीने पालन केले गेल्यास, पदभार न देण्याच्या प्रकरणांना ब-याच प्रमाणात आळा बसणे शक्य आहे असे शासनाची धारणा झालेली आहे. तेव्हा संबंधित अधिका-यांनी परिच्छेद १

OFFICE OF THE COLLECTOR,
RATNAGIRI.
1972

55

मध्ये स्पष्ट केलेल्या सूचनांचे अत्यंत कसोशीने पालन करावे अशी शासनाची अपेक्षा आहे. या व्यतिरिक्त आणखी काही सूचना खाली दिल्या आहेत, त्यांचीही कडक अंमलबजावणी होणे जरूर आहे.

(१) पंचायतीची मुदत संपत आली असता व पंचायतीच्या निवडणुकीचा कार्यक्रम ठरविल्याबरोबर संबंधित तहसिलदारांनी गट विकास अधिकाऱ्यांना त्या कार्यक्रमाची प्रत पाठवून सरपंच/उप-सरपंच यांच्या निवडणुकीचीही तारीख कळवावी. ही माहिती मिळाल्याबरोबर संबंधित गट विकास अधिकारी यांनी पंचायतीच्या सरपंच व उपसरपंच यांच्या निवडणुकीच्या अगोदरच पंचायतीचे संपूर्ण रेकॉर्ड व पैसे सचिवाचे ताब्यात येतील अशी व्यवस्था करावी.

(२) तसेच ज्या दिवशी सरपंच निवडणूक होणार असेल त्या दिवशी अथवा त्यानंतर शक्यतो लगेच गट विकास अधिकारी यांनी विस्तार अधिकारी यांना त्या पंचायतीला भेट देण्यास सांगावे व नवीन सरपंचांना पंचायतीचा चार्ज देण्याची व्यवस्था करावी. जर माजी सरपंचांनी चार्ज देण्याची टाळाटाळ केली तर, त्याचा रिपोर्ट ताबडतोब पंचायत सचिवांकरवी जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्याची व्यवस्था करावी. सचिवाने आपल्या रिपोर्टात माजी सरपंचाकडून येणे असलेले सर्व रेकार्ड व रक्कम यांची सविस्तर माहिती द्यावी पण लेखा अहवालातील आक्षेपित रकमांचा समावेश करू नये.

(३) पंचायत सचिवाकडून रिपोर्ट आल्याबरोबर दिनांक २८ ऑक्टोबर १९६९ च्या परिपत्रकातील आदेशानुसार जिल्हाधिकारी यांनी पुढील कार्यवाही एक महिन्याचे आत पूर्ण करावी.

(४) याबाबत सचिवांकडून जिल्हाधिकाऱ्याकडे रिपोर्ट पाठविण्यात दिरंगाई झाल्यास, त्यांचे विरुध्द जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यामार्फत खाते कार्यवाही करण्यांत यावी.

३. वरील उपाययोजना व उपरोल्लेखित परिपत्रकातील आदेशाची कसोशीने अंमलबजावणी झाल्यास, नवीन निवडून येणाऱ्या सरपंचांना चार्ज न मिळाल्याबाबतच्या तक्रारी उपस्थितच होणार नाहीत अशी शासनाची धारणा आहे. तरी सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना योग्य ते आदेश द्यावेत व त्यानुसार अंमलबजावणी होते किंवा कसे या बाबत तपासणीच्यावेळी खास लक्ष द्यावे व आवश्यक तेथे कडक इलाज योजावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या हुकुमाने व नांवाने,

म. वा. बापट,
कक्षाधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति